MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

## Special Issue 2022

**Date of Publication
13 August 2022**

**Guest Editors**

**Dr. M. N. Kolpuke,**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur

**Dr. D. S. Choudhari,**
Coordinator,
Internal Quality Assurance Cell,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

“Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

42) नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणा समोरील आव्हाने
**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे, जि.परभणी** ||162

43) नवीन शैक्षणिक धोरण आणि स्त्री शिक्षणासमोरील आव्हानांचा अभ्यास
**डॉ. रजनी अ. बोरोळे, जि. लातूर** ||166

44) उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कल
**कौशल्या चांगुजी खिल्लारे, औरंगाबाद** ||170

45) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० — एक दृष्टिक्षेप
**डॉ. आनंद मुसळे, जि.लातूर** ||173

46) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० समोरील आव्हाने व संधी
**प्रा.डॉ. धालगडे अरुण बळीराम, जिल्हा लातूर** ||178

47) भारतीय उच्च शिक्षणातील वास्तव व समस्या
**प्रा.डॉ. व्ही. पी. सांडूर, जि. लातूर** ||181

48) नवीन शैक्षणिक धोरण :एक सैद्धांतिक मूल्यमापन
**डॉ. प्रा. प्रमोद जी. शिंदे, लातूर** ||186

49) नवीन शैक्षणिक धोरण आणि संशोधनातील संधी
**डॉ. शिवराज पाटील, शिरूर ताजबंद** ||189

50) नवीन शैक्षणिक धोरणाचे टप्पे : एक अध्ययन
**डॉ. एस. पी. घायाळ, शिरूर ताजबंद** ||192

51) शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यातील समस्या व उपाययोजना
**बदनाळे शिवरूद्र शरणप्पा, अंकुर तानाजीराव पाटील** ||196

52) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२० : अमंलबजावणीतील पूर्व अटी
**डॉ. हरनावळे सी. के., नांदेड** ||199

53) उच्च शिक्षणातील विचार प्रवाह : दिशा व दृष्टी
**प्रा.डॉ. शंकरानंद येडले, लातूर** ||204

54) नविन शैक्षणिक धोरण २०२०
**प्रा.डॉ.बी.आर.शिंदे, जि.परभणी** ||212

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

उच्चांक वाढणार आहे.तसेच ग्रामीण भागातील मुलांचा सामाजिक जाणीव व्यापक केल्या जाऊ शकणार आहेत. त्यामुळे आजच्या काळातही त्यांची नीतिमूल्य टिकून राहण्यास मदत होणार आहे.अशी मुले खर्‍या अर्थाने राष्ट्रनिर्मिती मध्ये महत्त्वाची भूमिका बजाऊ शकतील. हे राष्ट्रीय शिक्षण धोरण राष्ट्रीय उद्धारासाठी पूरक आहे. जगात ताठ मानेने उभे राहण्याचे बळ देणारे माध्यम म्हणजे शिक्षण संस्था ह्या सर्व शिक्षण संस्था आपले शैक्षणिक कार्य अतिशय जोमाने व चोख बजावत आहेत.

**संदर्भः-**

१) http://niepid.nic.in /nep_२०२०.pdf
२) http://aishe.nic.in/aishe/viewdcoment.action
३) https://wwwmhrd.gov.in/sites/uplodfiles
४) http://www.evivek.com/Encyc/२०२०/९/६
५) https://marathivishwakosh.org/३१८३

⌘⌘⌘

**47**

# भारतीय उच्च शिक्षणातील वास्तव व समस्या

**प्रा.डॉ. व्ही. पी. सांडूर**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर

***********

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारतात शिक्षण हे पवित्र आणि उदात्त कार्य सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन मानले गेले. त्यामुळे शिक्षणासाठी फारसा मोबदला घेतला जात नसे. पण ब्रिटिश काळापासून शिकविण्यासाठी वेतन देण्यास सुरुवात झाली. विद्यार्थी हा केंद्रबिंदु मानला जाऊन शिक्षणाद्वारे मानव विकास होत असतो. उच्च शिक्षण हे मानवी विकासाचे व देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे अप्रगत व विकसनशील राष्ट्रांमध्ये देशाच्या व समाजाच्या विकासासाठी उच्च शिक्षणावर मोठी गुंतवणूक प्राधान्यक्रमाने केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील लोकशाही मजबूत करण्यासाठी व राष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी उच्चशिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे मत व्यक्त केले आहे. मागासलेले उपेक्षित लोक एकवेळ संपत्ती व सत्तेचे लाभ सोडायला तयार झाले तर फारसे बिघडत नाही, पण ते उच्च शिक्षणाच्या सर्वेच्च संधीपासून वंचित राहता कामा नये. यामागचे एकमेव उद्देश म्हणजे सत्ता व संपत्ती ही मिळाली व तिचा उपयोग करण्यासाठी दृष्टी नसेल तर तिचा उपयोग नसतो. याउलट उच्चशिक्षणाने व्यक्ती सबल झाला तर तो आपल्या प्रतिभेने समाजामध्ये अधिक विधायक बदल घडवून आणू शकतो. थोडक्यात, उच्च शिक्षण हे माणसांच्या अंतशक्ती जागा करण्याचे एकमेव साधन आहे. बाह्य किंवा पराभूत शक्तींनी माणसे गुलाम होतात.

मात्र तीच माणसे आत्मशक्तीने तेजाळून निघतात. त्यांच्या मते, कोणत्याही समाजाची उंची मोजायची झाली तर त्या समाजातील किती टक्के नागरिक उच्च शिक्षणाचा लाभ घेऊ शकले आहेत यावर मोजता येते. मोजपट्टी लावली तर भारतात सर्वाधिक विषमता दिसून येईल. यामुळे भारतसरकारने विविध समित्या आयोगाच्या माध्यमातून उच्चशिक्षणासाठी प्रयत्न केले आहेत. २१ व्या शतकातील भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपायांची चर्चा केली आहे. शिक्षण व्यवस्थेसमोर शिक्षणाचे खाजगीकरण व व्यापारीकरण रोखण्याचे मोठे आव्हान आहे. शिक्षणव्यवस्थेत १९८० अगोदर अनुदान, १९८० च्या दशकात विनाअनुदान आणि २०१० च्या दशकात कायम विनाअनुदान धोरणाचा स्वीकार केला. परिणामी शिक्षणाला बाजारी रूप प्राप्त झाले. २००४ मध्ये खाजगी विद्यापीठे विधेयक व अध्यादेश पारित करून खाजगी विद्यापीठांच्या स्थापनेस प्रोत्साहन देण्यात आले. AISHE (२०१८—१९) च्या अहवालानुसार देशातील ९९३ विद्यापीठांपैकी ३८५ खाजगी विद्यापीठे आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सुरू करण्यास परवानगी दिल्याने शिक्षणाच्या खाजगीकरण व व्यापारीकरणास बळ प्राप्त झाले आहे.

**संशोधनाचे उद्दष्टे :**

भारतातील उच्चशिक्षणाचा आढावा घेणे.

भारतीय उच्चशिक्षणातील विविध समस्यांचा अभ्यास करणे.

भारतातील उच्चशिक्षणाचे वास्तव किंवा स्थिती समजून घेणे.

भारतातील उच्च शिक्षणावर उपाय सुचविणे

**संशोधनाची गृहितके :**

भारताला उच्चशिक्षणाची प्राचीन परपंरा लाभलेली आहे.

भारतात सध्यस्थितीमध्ये उच्चशिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.

भारतात उच्चशिक्षणामध्ये व्यापारीकरण ही एक प्रमुख समस्या आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत लघुशोधनिबंधासाठी सामाजिकशास्त्रातील वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये तथ्यसंकलन करताना संदर्भसाहित्य, विविध मासिके, साप्ताहिक व राष्ट्रीय शिक्षण धोरण अधार घेण्यात आला आहे.

**भारतीय उच्चशिक्षणाचे वास्तव :**

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आणि त्या अगोदरच्या अनेक आयोगानी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. भारतात शिक्षणावरील गुंतवणूक राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के असावी असा आग्रह राहीला आहे. भारतात महाविद्यालये आणि विद्यापीठांची संस्थात्मक वाढ सातत्याने होत आहे. भारतात १९९५ साली २२८ विद्यापीठे, १००० महाविद्यालये आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६० लाख होती.

आज भारतात उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण हे २००६—०७ च्या आकडेवारीनुसार ११ टक्के आहे. म्हणजे १८ ते २३ वयोगटातील ८९ टक्के तरुणांना उच्च शिक्षणाची संधी मिळत नाही. त्याचबरोबर देशातल्या विविध ५८४ जिल्हयांपैकी ३६३ जिल्हयांत उच्च शिक्षण नोंदणीचे प्रमाण हे राष्ट्रीय प्रमाणपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. देशात उच्च शिक्षण सर्वाधिक घेणाऱ्या राज्यांमध्ये नागालँड व गोवा राज्याचा क्रमांक प्रथम येतो तेथे १९ टक्के हे प्रमाण आहेत तर त्यानंतर केरळ मध्ये १८.५ टक्के इतके प्रमाण आहे. सर्वात कमी प्रमाण हे अरुणाचल प्रदेशात केवळ ४ टक्के इतके आहे. तसेच महाराष्ट्रात हे प्रमाण केवळ १३ टक्के इतके आहे.

जागतिक स्थितीचा विचार केल्यास विकसित देशांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण ५५ टक्के आहे तर विकसनशिल देशात हे प्रमाण ३६ टक्के असून सर्वसाधारण विकसनशिल राष्ट्रांमध्ये हे प्रमाण २३ टक्के इतके आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, भारताला प्रगत देशाबरोबर बरोबरी करावयाची असेल तर दुप्पटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत ग्रामीण व शहरी असा भेद केला असता. युवकांचे उच्चशिक्षण घेण्याचे प्रमाण हे ग्रामीण भागात ७ टक्के तर शहरी भागात २० टक्के प्रमाण असल्याचे दिसून येते. देशात अनूसूचित

जाती व दलितांमध्ये हे प्रमाण ६.३० टक्के इतके आहे. ओबीसी मध्ये ८.५ टक्के इतके आहे. तर मुलींचा विचार केला असता हिंदू मध्ये ९.३२ टक्के आहे सर्वात अधिक ख्रिश्चन समाजामध्ये १६ टक्के इतके आहे. सर्वात कमी मुस्लिम समाजात ५.८ टक्के दिसून येते.

असे असले तरी आज खेडयापाडयात उच्चशिक्षण पोहचले आहे असे भासवले जाते परंतु वास्तवात तेथे केवळ कागदोपत्री पदव्या पोहचल्या आहेत. संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणात होत आहे परंतु गुणात्मक वाढ ही अल्पसी दिसून येते आहे याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणातील समस्या होय.

**उच्चशिक्षणातील समस्या :**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काळानूसार व परिस्थितीनूसार बदल करणे आवश्यक आहे. आजच्या उच्चशिक्षण व्यवस्थेमध्ये धोरणात्मक व कार्यात्मक अशा अनेक समस्या असल्याचे दिसून येते. भारतात उच्च शिक्षण घेण्याज्यांचे प्रमाण हे अत्यंत अल्पसे आहे. याचे बरोबर संख्यात्मक व गुणात्मक समस्या ही अधिक दिसून येतात.

महाविद्यालयातील प्रवेशातील विद्यार्थी अधिक असतात परंतु मोठया संख्येने विद्यार्थी वर्गामध्ये गैरहजर असल्याचे दिसून येते. गैरहजेरीचे प्रमाण देशातील मोठमोठी शहर किंवा तेथील काही महाविद्यालये सोडली तर इतरत्र सर्वत्र गैरहजेरीचे प्रमाण दिवसेंदिवस अधिकच वाढतच आहे. यामध्ये प्रामुख्याने ७० टक्क्यापर्यंत हे प्रमाण वाढत आहे.

भारतीय उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम हा पारंपारिक पध्दतीचा कारकुनी पध्दतीचा असल्याचे दिसून येते. त्याचा व्यवहारिक जीवनात फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे भारतीय शिक्षण व्यावसाभिमुख बनविणे आवश्यक आहे.

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये अध्यापन पध्दती, कालबाह्य अभ्यासक्रम तरुणांची उदासिनता या सर्व कारणामुळे शिक्षण व्यवस्थेत असंख्य कच्चे दुवे निर्माण झाली आहेत. विद्यार्थ्यांचा विचार न करता अभ्यासक्रम ठरविण्यात येत नाही. तेच पारंपारिक अध्ययन व अध्यापन पध्दती प्रामुख्याने दिसून येते.

देशातील अनेक भागातील अनेक विद्यापीठातून परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आले आहेत. परीक्षेतील गैरप्रकारामुळे हुशार विद्यार्थ्यांपेक्षा कधीच महाविद्यालयाचे तोंड न पाहणारा विद्यार्थी गुण जास्त घेऊन उत्तीर्ण होत आहे.

शिक्षण जीवनोपयोगी असावे परंतु आजच्या शिक्षणाने हा उद्देश साधला जात नाही असे दिसते. नोकरीसाठी शिक्षण असा सर्वत्र सूर दिसून येतो. आजच्या शिक्षणाने विद्यार्थी स्वावलंबी होऊन स्वतंत्र जीवन जगू शकत नाही. मिळविलेल्या पदवीचा नेमका उपयोग काय हे न समजून अनेक युवक बेकार झालेले दिसून येतात.

राजकारणी नेतृत्त्व भारतीय उच्च शिक्षणांमध्ये बदल करण्यास तयार नाहीत कारण यामुळे त्यांच्यात स्वावलंबीपणा निर्माण होऊन त्यांना मदत करण्यासाठी कार्यकर्ते मिळणार नाहीत यामुळे यामध्ये बदल केला जात नाही. तसेच अनेक नेतृत्वांच्या संस्था असल्यामुळे कार्यक्षमत अध्यापक ऐवजी भ्रष्टाचार, वशिलेबाजी, भाईभतिजा या माध्यमातून भरती होताना दिसून येते. त्यामुळे शिक्षण देखील दर्जेदार मिळेल याबाबत शंका येते.

अशा विविध समस्या भारतीय उच्च शिक्षणात दिसून येतात.

**उच्चशिक्षणावरील उपाय :**

वर उल्लेखित आव्हानांची सोडवणूक करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांची चर्चा करणेही आवश्यक आहे. शिक्षण ही नफा कमावण्याचे साधन नसून एक सुदृढ व सक्षम नागरिक घडवण्याची कार्यशाळा आहे. त्यामुळे शिक्षणातील खाजगीकरण व व्यापारीकरणाचे धोरण बंद करून सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शिक्षणावरील निधीत वाढ करणे गरजेचे असून कोठारी आयोग व १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने जीडीपीच्या ६% निधी खर्च करण्याचे सुचविले होते. स्वातंर्त्याच्या ७३ वर्षानंतरही त्या शिफारशीची अंमलबजावणी झाली नाही. आजच्या महागाई निर्देशकानुसार जीडीपीच्या ९% खर्च शिक्षणावर करणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उच्च

शिक्षणसंस्थातील शिक्षकांच्या रिक्त जागा १००% भरणे आवश्यक आहे.

विद्यापीठावरील संलग्नित महाविद्यालयाचा भार कमी करण्यासाठी केंद्रीय/राज्य विद्यापीठे, आयआयटी, आयआयएम व राष्ट्रीय विज्ञान संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाने सुचविलेला उच्च शिक्षणसंस्थांची पुनर्रचना व एकत्रीकरण करण्याचा पर्याय व्यवहार्य नाही. संशोधनावर अधिकाधिक गुंतवणूक करून मूलभूत व समाजोपयोगी संशोधनाला प्राधान्य देणे क्रमप्राप्त ठरते. अभ्यासक्रम कालसुसंगत व रोजगारक्षम विकसित करणे २१व्या शतकातील ज्ञानाधिष्ठित समाजाची गरज आहे. यासोबतच अभ्यासक्रमात मानवी मूल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, कौशल्य विकास इत्यादीचा अंतर्भाव करणेही आवश्यक आहे.

शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखणे व प्रवेश प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षणाचा विस्तार करणे, रोजगारक्षम अभ्यासक्रम बनविणे, गुणवत्तेचा दर्जा सुधारणे, शिक्षणात संधीची समानता देणे, विद्यार्थ्यांना दर्जेदार सोयी—सुविधा उपलब्ध करून देणे, इत्यादी बाबी प्राधान्यक्रमाने कराव्या लागतील. सर्वांना समान, मोफत, सक्तीचे व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे घटनेने बंधनकारक केले आहे. त्यानुसार गुणवत्तापूर्ण व संधीची समानता असणारे शिक्षण देण्यास प्राधान्यक्रम दिला पाहिजे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात अध्ययन —अध्यापन व संशोधनात प्रभावी माहिती—तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे असून त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या सोयी—सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. थोडक्यात, २१ व्या शतकातील भारतीय उच्च शिक्षणव्यवस्थेसमोर विविध आव्हाने असून त्यावर सुचविलेल्या उपाययोजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**सारांश :**

भारतीय शिक्षणातील विविध समस्याला सामोरे जाऊन आर्थिक विकासातभारताला अग्रेसर होण्यासाठी योग्य शौक्षणिक नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी आजच्या शिक्षण पध्दतीत बदल करुन रोजगारभिमुख, स्वयंरोजगार, व्यावसायिक शिक्षण, मूल्य शिक्षण, नौतिक शिक्षण या मुलभूत उद्दिष्टांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्रावर कमी गुंतवणूक, महागडे शिक्षण, बेसुमार वाढत चाललेली बेरोजगारी (एका निरीक्षणानुसार भारतात पदवी विद्यार्थ्यांच्या बेरोजगारीचे प्रमाण ३५ टक्के आहे तर अशिक्षित युवकांच्या बेरोजगारीचे प्रमाण ६.२ टक्के आहे), रोजगारक्षम शिक्षणाचा अभाव (पदवीधर विद्यार्थ्याच्या एकूण संख्येपैकी केवळ ४५ टक्के विद्यार्थी हे रोजगारक्षम आहेत (India Skills Report 2008), काळाशी सुसंगत नसलेले अभ्यासक्रम, कालबाह्य अध्यापन पद्धती, शिक्षणातून नोकरीची शाश्वती नसणे, आर्थिक विवंचनेत सापडलेला समाज, इत्यादी घटक उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण न वाढण्यास कारणीभूत आहेत. शिक्षण घेऊन नोकरी मिळत नाही व घेतलेले शिक्षण प्रत्यक्ष व्यवहारात नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून देत नाही. परिणामी ‘अर्थार्जनङ करण्याइतकीही शिक्षणातून उपलब्धी होत नसल्याची मानसिकता वाढत चालली आहे. त्यासोबतच आर्थिक परिस्थिती आणि इतर काही कारणामुळे अर्धवट शिक्षण सोडणाऱ्यामुळे गळतीचे प्रमाण वाढत आहे. कोरोनाने तर काही जणांच्या जगण्याचेच प्रश्न निर्माण केले आहेत. मुलांच्या शिक्षणाचा विषय तर त्यांच्यासाठी अधिक चिंतनीय आहे. या काळात उद्योगधंदे बंद झाल्याने अनेकांचे रोजगार बुडाले. परिणामी काही कुटुंबांना आपल्या गावाकडे स्थलांतरित व्हावे लागले. ती मुले आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण प्रवाहाच्या बाहेर आहेत. त्याचा परिणाम प्रवेश प्रमाणावर होणार आहे.

स्वातंर्त्यानंतर गठित विविध आयोग व समित्यांनी शिक्षणातील प्रवेश प्रमाण वाढविण्यासाठी ज्या शिफारशी केल्या होत्या त्याची परिणामकारक अंमलबजावणी न केल्यामुळे आजही आपण २५ टक्क्यांच्या आसपासच आहोत. २०१४—१५ ते २०१८—१९ या ५ वर्षाच्या प्रवेश प्रमाणाचा विचार करता ही वाढ अतिशय मंद गतीने चालू असल्याचे दिसते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये हे प्रवेश प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्यांवर नेण्याचे निश्चित केलेले उद्दिष्ट स्वागतार्ह असले तरी त्याच्या पूर्ततेसाठी विद्यार्थी केंद्रित शिक्षणाची व्यवस्था निर्माण करून शिक्षणात गुणवत्ता, सर्वांना

समान संधी आणि उच्च शिक्षण संस्थांचा विस्तार करणे आवश्यक आहे. धोरणात मागास प्रदेशात प्रवेश (access), समानता (equity) आणि अंतर्भाव (inclusion) या आधारे उच्च शिक्षण संस्था स्थापन करण्याचे, प्रत्येक जिल्ह्यात एक बहुविद्याशाखीय उच्च शिक्षणसंस्था व काही ठिकाणी बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे (MERU) उभारण्याचे धोरण स्वागतार्ह आहे. परंतु धोरणातील एकल विद्याशाखेची व कमी विद्यार्थी संख्येची महाविद्यालये बंद करण्याच्या तरतुदीचा फटका ग्रामीण, मागास, आदिवासी व डोंगराळ भागातील शिक्षण संस्थांना बसणार आहे. त्याचे दूरगामी परिणाम प्रवेश प्रमाणावरही होणार हे ओघाने आलेच.

उच्च शिक्षणातील प्रवेश प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, सर्वांना शिक्षण सक्तीचे करणे, शिक्षणावरील गुंतवणूक वाढविणे, गुणवत्तेच्या आधारावर शिक्षकांची नियुक्ती करणे, अभ्यासक्रम कालसुसंगत करणे, व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमावर भर देणे, रोजगाराची उपलब्धता असणारे नवीन कोर्सेस सुरू करणे, अध्यापनाची प्रक्रिया परस्परसंवादी (Interactive) करून त्यामध्ये चर्चा, गटचर्चा, वाद—विवाद करण्यास प्रोत्साहन देणे, समाजातील परोपकारी लोकांनी गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दत्तक घेणे, सर्टिफिकेट कोर्सेसमधून कौशल्याचे ज्ञान, मूल्यशिक्षण आणि प्रशिक्षण देणे, मानव्यविद्या, सामाजिक शास्त्रे व मूलभूत विज्ञानाची सांगड व्यावसायिक शिक्षणासोबत घालणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विशेष सवलती, मागास, वंचित व आदिवासी घटकांना शिष्यवृत्या, प्रवेश प्रमाण वाढविण्यासाठी टास्क फोर्स तयार करणे, इत्यादी उपाय करणे आवश्यक आहे.

शिक्षण माणसाचे मन, मनगट व मेंदू बळकट करणारे एक धारदार शस्त्र आहे. शिक्षण जगाकडे चिकित्सक पद्धतीने बघण्याची दृष्टी देते असे ब्राझीलमधील थोर शिक्षणतज्ञ पाउलो फ्रेअरीने म्हटले होते. खर्‍या अर्थाने युवक हा देशाचा भावी आधारस्तंभ असल्याने उद्याच्या उज्वल, सशक्त व समृद्ध भारताच्या विकासाचे स्वप्न युवकच साकार करणार आहेत. त्यामुळे सर्व युवकांना सक्तीचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक आहे.

## ८) संदर्भ :

उच्च शिक्षण, व्यक्तिमत्व विकास व मानवी मूल्ये, (संपा.) डॉ. नागोराव कुंभार, अरुणा प्रकाशन, लातूर, २०११.

ध्यास परिवर्तनाचा डॉ. जनार्दन वाघमारे गौरव ग्रंथ, (संपा.) डॉ. सूर्यनारायण रणसुभे, विवेक प्रिंटर्स सवर्हिस, लातूर, २०११.

बदलते भारतीय शिक्षण, अर्थकारण, समाजकारण व राजकारण, (संपा.), ब्रिजमोहन दायमा, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०१२.

भारतीय राज्यव्यवस्था समकालीन कळीचे मुद्दे, तुकाराम जाधव, मुक्ता कुलकर्णी, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स, पुणे, २०१८.

दैनिक लोकसत्ता व लोकमत.

लोकशाही आणि शिक्षण, डॉ. जनार्धन वाघमारे पदमगंधा प्रकाशन पुणे.

शिक्षण आणि समाज समाजशास्त्र संशोधन पत्रिका मार्च २०१५.

⌘⌘⌘